# शिवाजी विद्यापीठात ई-कार्यशाळा उत्साहात

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ, सामाजिक वंचितता व समावेशक धोरण अभ्यास केंद्र आणि बंगळूर येथील स्टेटक्राफ्ट सॉफ्टवेअर कंपनीच्या वतीने स्टेटक्राफ्टचा वापर करून क्वाँटिटेटिव्ह डेटा ॲनालिसिस या विषयावर ई-कार्यशाळा आयोजित करण्यात आली.

कार्यशाळेचे उद्घाटन केंद्राचे संचालक प्रा. जगन कराडे यांनी केले. कोरोना लॉकडाऊन अवस्थेत शिवाजी विद्यापीठाने क्षमता वाढीसाठी विद्यार्थी, संशोधक विद्यार्थी आणि शिक्षणतज्ज्ञांपर्यंत पोहोचण्यासाठी वेगवेगळे उपक्रम घेण्यात येत आहेत त्याचाच एक भाग म्हणून केंद्राच्या वतीने सदर ई-कार्यशाळा आयोजित केली आहे.

स्टेटक्राफ्ट सॉफ्टवेअर कंपनीचे सुभदीप डे, बंगळूर या कार्यशाळेचे स्त्रोत



व्यक्ती होते. कार्यशाळेच्या पहिल्या सत्रात त्यांनी स्टॅटक्राफ्ट सॉफ्टवेअर आणि विविध साधनांबद्दल मांडणी केली. तर दुसऱ्या सत्रामध्ये त्यांनी डेटा व विविध सांख्यिकीय मोजमाप कसे करावे आणि सॉफ्टवेअर कसे वापरावे याची माहिती दिली. अविनाश भाले यांनी आभार मानले. या ई-कार्यशाळेत भारतभरातून अनेक संशोधक विद्यार्थी, शिक्षणतज्ज्ञ सहभागी झाले होते.

यावेळी सुभदीप, मुधसुधन जी, सौम्या नायकर, स्टेटक्राफ्ट, बेंगळुरू आणि सामाजिक वंचितता व समावेशक धोरण अभ्यास केंद्रातून डॉ. किशोर खिलारे, श्रीधर साळोखे याचे सहकार्य मिळाले.

# विद्यापीठ परीक्षा संचालक कार्यभार गुरव यांच्याकडे

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यामापन मंडळाच्या संचालकपदाचा तात्पुरता कार्यभार डॉ. आर. व्ही. गुरव यांच्याकडे सोपविण्यात आला आहे. परीक्षा मंडळाचे प्रभारी संचालक डॉ. जी. आर. पळसे हे ३१ जुलै ते १२ ऑगस्ट या कालावधीत वैद्यकीय रजेवर आहेत. त्यामुळे त्यांच्या पदाचा तात्पुरता कार्यभार प्रभारी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांनी गुरव यांच्याकडे दिला आहे. गुरव सध्या विद्यापीठ विकास मंडळाचे संचालक म्हणून काम करीत आहेत. पण विद्यापीठ नियमांनुसार या पदाचा कार्यभार हा उपकुलसचिव पदाच्या व्यक्तीकडे द्यावा, अशा मागणीचे पत्र विद्यापीठ कर्मचारी संघाचे अध्यक्ष वसंतराव मगदूम यांनी प्रभारी कुलगुरू डॉ. करमळकर यांच्याकडे दिले आहे.